# <u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>

क्र.सहआयुक्त/परि-3/परिपत्रक/ 2282 , दि. 03.11.2023

सह आयुक्त (परि-3) यांचे कार्यालय,
3 रा मजला, के/पूर्व विभाग कार्यालय इमारत,
आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पूर्व),
मुंबई 400 069.

## <u>परिपत्रक</u>

विषय: बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कामासंबंधातील ई-कोटेशन / अतारांकित निविदा प्रकरणी आढळून आलेल्या अनियमिततेबाबत कंत्राटदारांविरूध्द करण्यात आलेल्या चौकशीच्या अनुषंगाने बजावण्यात येणा-या शिक्षादेशाबाबत.

संदर्भ: 1) क्र.एमजीसी/एफ/5666, दि.04.03.2015 व दि.09.04.2015
2) क्र.एमजीसी/एफ/6684, दि.25.06.2018 व दि.16.08.2018

विषयांकीत प्रकरणी, मा. महानगरपालिका आयुक्त यांनी पारित केलेल्या संदर्भ क्र.1 अन्वयेच्या आदेशान्वये त्रिसदस्यीय चौकशी समितीस चौकशी करण्याचे आदेश पारित केले होते. तसेच, महानगरपालिका आयुक्तांच्या दि.26.03.2015 अन्वयेच्या आदेशान्वये संबंधित विभाग कार्यालयातील विभाग कार्यकारी अभियंता / सहा. आयुक्त यांना संबंधित कंत्राटदारांवर 'कारणे दाखवा नोटिस' बजावून तदनुषंगाने अभिप्राय त्रिसदस्यीय चौकशी समितीस सादर करण्याचे आदेश पारित केले.

चौकशीअंती मा. महानगरपालिका आयुक्त यांच्या संदर्भ क्र.2 अन्वयेच्या मंजूरीनुसार खालील नमूद केलेल्या कंत्राटदारांवर त्यांच्यासमोरील रकान्यात नमूद केल्याप्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

02/11/2023
सह आयुक्त (परि-3)

Order Issued by JtMC(Z-III) Office

| अनु. क्र. | कंत्राटदार | वेन्डर नं. | कंत्राटदारावर करण्यात आलेली कारवाई |
|---|---|---|---|
| 1. | मे. श्री. शिवशक्ती इंटरप्रायझेस | 21553 | मे. श्री. शिवशक्ती इंटरप्रायझेस (वेन्डर नं.21553) यांजवर ठेवण्यात आलेले आरोप सिध्द होत असल्याने त्यांना शिक्षा म्हणून रू.50,000/- इतका दंड करण्यात येत आहे. |
| 2. | मे. ए. जे. एन्टरप्रायझेस | 18203 | मे. ए. जे. एन्टरप्रायझेस (वेन्डर नं.18203) यांजवर ठेवण्यात आलेले आरोप सिध्द होत असल्याने त्यांना शिक्षा म्हणून रू.5,00,000/- (रु. पाच लाख) इतका दंड करण्यात येत आहे. |
| 3. | मे. रिध्दी सिध्दी इंटरप्रायझेस | 20952 | मे. रिध्दी सिध्दी इंटरप्रायझेस (वेन्डर नं.20952) यांजवर ठेवण्यात आलेले आरोप सिध्द होत नसल्याने त्यांच्याविरूध्द कोणतीही कारवाई करण्यात येत नाही. |
| 4. | मे. विनायक ट्रेडिंग कंपनी | 21659 | मे. विनायक ट्रेडिंग कंपनी (वेन्डर नं.21659) यांजवर ठेवण्यात आलेले आरोप सिध्द होत असल्याने त्यांना शिक्षा म्हणून त्यांची मनपा कंत्राटदार म्हणून असलेली नोंदणी दोन वर्षाकरिता रद्द करण्यात येत आहे. |
| 5. | मे. यशवी कंस्ट्रक्शन | 16557 | मे. यशवी कंस्ट्रक्शन (वेन्डर नं.16557) यांजवर ठेवण्यात आलेले आरोप सिध्द होत असल्याने त्यांना शिक्षा म्हणून रू.2,00,000/- (रु. दोन लाख) दंड करण्यात येत आहे. |
| 6. | मे. जय माता दी कंस्ट्रक्शन्स | 17568 | मे. जय माता दी कंस्ट्रक्शन्स (वेन्डर नं.17568) यांजवर ठेवण्यात आलेले आरोप सिध्द होत असल्याने त्यांना शिक्षा म्हणून त्यांची मनपा कंत्राटदार म्हणून असलेली नोंदणी 2 वर्षाकरिता रद्द करण्यात येत आहे. |

21/11/2023

सह आयुक्त (परि-3)